जा.क्र.विकास-2/गा.हं.2017-18/परिपत्रक/234/2017
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - 411005
Website: mahasugarcom.gov.in
Email: commsugarvikas@gmail.com
दिनांक : 8 सप्टेंबर , 2017

# परिपत्रक

**विषय : गळीत हंगाम 2017-18 साठी गाळप परवाना मिळणेकरिता ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत ...**

संदर्भ : केंद्र शासनाचे ऊस नियंत्रण आदेश 1966 व राज्य शासनाचे महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण आणि गाळप व ऊस पुरवठा नियमन ) आदेश 1984 मधील तरतुदी...

महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण आणि गाळप व ऊस पुरवठा नियमन ) आदेश 1984 व त्यामध्ये वेळोवेळी झालेली दुरुस्ती नुसार सन 2017-18 चे गाळप हंगामासाठी साखर कारखान्यांचे **ऑनलाईन गाळप परवाना अर्ज** मागविण्यात येत आहेत. मा. मंत्री समितीचे सभेतील निर्णय झाल्यानंतर निश्चित केलेल्या दिनांकापासून गाळप हंगाम सुरू होईल. कारखान्यांनी गाळप परवाना मिळण्याकरिता, ऑनलाईन गाळप परवाना मागणी अर्ज **दिनांक 30 सप्टेंबर, 2017** पूर्वी सादर करावा.

**ऑनलाईन गाळप परवाना अर्ज करताना खालील प्रमाणे पुर्तता करावी.**

1. गाळप परवाना प्रस्ताव ऑनलाईन भरणा करण्यासाठी कारखान्यानी लॉगईन आयडी व पासवर्ड वापरुन (http://crushinglic.mahasugar.co.in/login.aspx) या वेबसाईटवर आपला ऑनलाईन गाळप परवाना अर्ज सादर करावा. माहिती भरण्याबाबतची कार्यप्रणाली यापुर्वीच सर्व कारखान्यांना पाठविण्यात आलेली आहे. तसेच वेबसाईट वर देखील मॉडेल उपलब्ध आहे.
2. ऑनलाईन गाळप परवाना अर्जामध्ये खालील प्रमाणे माहिती भरणा करावी.
   - गाळप परवाना व कार्यक्षेत्राबाहेरील ऊसाचे गाळपासाठी परवाना फी व सुरक्षा अनामत खालील लेखाशिर्षाप्रमाणे शासकीय कोषागारात जमा करणे आवश्यक आहे. कोषागारात चलनाने भरलेल्या सुरक्षा अनामत रक्कमा व गाळप परवाना फी बाबत चलनाच्या प्रमाणित सत्यप्रती (PDF).
   - **गाळप परवाना फी - 0425 - सहकार, 800 - इतर जमा रक्कमा, (01) (20) लायसेन्स फी** (0425 0232 01)
   - **गाळप सुरक्षा अनामत - 8443 - सिव्हील डिपॉझिट 103 (00) (01) सिक्युरिटी डिपॉझिट** (8443 5029 01)
3. कारखाना ऊस नोंद यादी **परिशिष्ट क्र. 2 (अ) (ब) (क) (ड)** मध्ये Excel Sheet वर Arial Unicode MS मध्ये भरणा करावीत.
4. प्रदुषण नियंत्रण मंडळाचे **Consent to operate** प्रमाणपत्राची सत्यप्रत (PDF)
5. **मुख्यमंत्री सहाय्यता निधी सन 2016-17 चे गाळपावर रु. 2/- प्रतिटन प्रमाणे** (दिनांक 3 ऑक्टोबर, 2016 रोजीचे मा. मंत्री समिती चा निर्णय) **मुख्यमंत्री सहाय्यता निधी स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, मुंबई खाते क्र. 10972433751, IFSC CODE: SBIN0000300** मध्ये RTGS / NEFT या ECS पध्दतीने भरणा करावी.

6. **साखर संकुल निधी सन 2016-17 चे गाळपावर रु.0.50/- प्रतिटन प्रमाणे**
(दिनांक 3 ऑक्टोबर, 2016 रोजीचे मा. मंत्री समिती चा निर्णय) **साखर संकुल निधी स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे खाते क्र.** 34971605771, **IFSC CODE: SBIN0007339** मध्ये RTGS / NEFT या ECS पध्दतीने भरणा करावा.

7. जे कारखाने भाडेतत्त्वावर / भागिदारी तत्त्वावर गाळप हंगाम घेणार आहेत अशा कारखान्यांनी झालेला करार व त्यास मिळालेल्या शासन / साखर आयुक्तालयाच्या मान्यतेची प्रत व करारातील अटी शर्तीनुसार केलेली पूर्तता ( कागदपत्रांसह ).
8. चाचणी हंगाम घेणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांनी Plant Code Number (केंद्र शासनाकडून प्राप्त करुन घेऊन) आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाचा दाखला (consent to operate) (PDF) सादर करावा.
9. औद्योगिक उद्योजकता प्रमाणपत्र IEM ची प्रत. (प्रत्यक्ष गाळप क्षमतेएवढा IEM असल्याची सुधारीत (PDF) प्रत सादर करणे, बंधनकारक राहिल.)

## गाळप हंगामाच्या अनुषंगाने सर्वसाधारण सुचना

महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण आणि गाळप व ऊस पुरवठा नियमन )आदेश 1984 व त्यामध्ये वेळोवेळी झालेली दुरुस्ती नुसार अद्ययावत तरतूदी व गाळप हंगाम 2017-18 करिता होणारी मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील मंत्री समितील निर्णय येत्या हंगामातील ऊस गाळपासाठी लागू राहतील.

1. शासनाचे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडील राजपत्र, अधिसूचना दिनांक 14 ऑक्टोबर, 2015 नुसार सन 2017-18 गाळप हंगामासाठी गाळप क्षमतेनुसार सुरक्षा अनामत रक्कम व गाळप परवाना फी चलनाने शासकीय कोषागारात भरण्यात यावी.

2. गाळप परवाना फी व सुरक्षा अनामत रक्कम दि. 30 सप्टेंबर, 2017 पूर्वी भरणा करणे आवश्यक आहे.

3. ऑनलाईन गाळप परवाना अर्ज विहित मुदतीत सादर न करणे, गाळप परवाना प्राप्त करुन न घेताच गाळप सुरु करणे तसेच गाळप परवान्यातील अटींचे पालन न करणे याबाबत महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण आणि गाळप व ऊस पुरवठा नियमन ) आदेश 1984 व त्यामध्ये वेळोवेळी झालेली दुरुस्ती नुसार कारवाई करण्यात येईल.

4. सन 2017 - 18 च्या गळीत हंगामासाठी 160 दिवसांकरीता गाळप परवाना देण्यात येईल. सदर परवाना कारखान्याचा गाळप हंगाम अथवा ऊस संपेपर्यन्त लागू राहील. कारखाना साखर आयुक्तांचे पूर्व परवानगी शिवाय बंद करु नये. गाळप सुरु केल्यानंतर येणाऱ्या अडीअडचणींचे निराकरण संबंधीत प्रादेशिक सहसंचालक (साखर) करतील.

5. कार्यक्षेत्राबाहेरील शेतकऱ्यांनाही शासनाचे धोरणानुसार ऊसाचा दर देणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत त्यांना रोख स्वरुपात (काटा) पेमेंट न देता बॅक खात्यावरच रक्कम जमा करावी. कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील बिगर सभासदांना ऊसदर समान देण्यात यावा.

6. ऊस तोडणी व वाहतुक खर्चाची कमाल मर्यादा निश्चित करण्याकरिता शासन परिपत्रक दिनांक 8 मार्च, 2017 अन्वये कार्यवाही करणे बंधनकारक राहिल.

7. गाळप हंगामातील दररोजचा गाळपाचा अहवाल साखर आयुक्तालयाने ठरवून दिल्याप्रमाणे कारखान्याने सुट्टीच्या दिवशी सुध्दा पाठविणे अनिवार्य राहील. त्याकरीता निश्चित व्यक्तिवर जबाबदारी सोपवावी. त्यांचे नाव

व भ्रमण दुरध्वनी (ज्यावरुन SMS करणार आहे तो) कार्यकारी संचालकाच्या स्वाक्षरीने प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचेकडे सादर करावा.

8. गळीताचा पाक्षिक प्रागतिक अहवाल **प्रपत्र क्र.** 8 मध्ये साखर आयुक्तालयास व प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांना सादर करावा. इतर आवश्यक ती सर्व माहिती प्रादेशिक सहसंचालक (साखर) व या कार्यालयाचे मागणी नुसार वेळेत सादर करावी.

9. हंगाम 2017 - 18 चे गाळपासाठी नोंद केलेला सर्व ऊस गाळप करण्याची जबाबदारी संबंधीत साखर कारखान्याची राहील.

10. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., मुंबई यांनी ऊस तोडणी कामगारांना लागू केलेली पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखेपाटी ऊस तोडणी व वाहतुक शेतमजुर सुरक्षा विमा योजना कारखान्यांना बंधनकारक राहिल.

साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

प्रति :

1. प्रादेशिक सहसंचालक ( साखर ), सर्व
2. कार्यकारी संचालक, सहकारी साखर कारखाना लि., सर्व.
3. जनरल मॅनेजर, खाजगी साखर कारखाना लि., सर्व.
4. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या.,साखर भवन, 11 वा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई- 21
5. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या.,मुंबई .

प्रत :

1. महासंचालक, वसंतदादा साखर संस्था, मांजरी, पुणे.
2. मा. अपर मुख्य सचिव (सहकार), महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-32 यांना माहितीस्तव सादर.